**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक २० मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **खरीप हंगामासाठी खतांची उपलब्धता वाढवण्याच्या दृष्टीने बोली प्रक्रियेची सरकारकडून पूर्तता.**
2. **महाराष्ट्रात चवदार तळे सत्याग्रहाच्या ९९ व्या वर्धापन दिनानिमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकरांना आदरांजली.**
3. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कूल ऑफ लॉ येथे २३व्या 'जस्टा कॉजा' महोत्सवांतर्गत राष्ट्रीय युवक संसद व वादविवाद स्पर्धा आयोजित.**
4. **विदर्भात अवकाळी पावसाने पिकांचे नुकसान.**

बोली प्रक्रिया

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर सरकारने यंदाच्या खरीप हंगामासाठी खतांची उपलब्धता वाढवण्याच्या दृष्टीने सक्षमसाठी व्यवस्थापन समितीबरोबरची बोली प्रक्रिया पूर्ण केली आहे. त्यामुळे युरिया खताच्या उत्पादनासाठी अतिरिक्त नैसर्गिक वायूसाठा उपलब्ध झाला असून त्यामुळे देशांतर्गत युरिया उत्पादन वाढणार आहे. यापूर्वी देशात ५४ हजार ५०० मेट्रिक टन प्रतिदिन इतकं युरिया उत्पादन होत होतं, ते आता ७६ हजार मेट्रिक टन प्रतिदिन इतकं वाढेल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सध्या देशात ६१ लाख १४ हजार मेट्रिक टन इतका साठा उपलब्ध असून उत्पादनात वाढ झाल्यास त्याचा फायदा यंदाच्या खरीप हंगामासाठी होणार आहे.

चवदार तळे सत्याग्रह

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी रायगड जिल्ह्यातल्या महाड इथं केलेल्या चवदार तळे सत्याग्रहाला आज ९९ वर्ष पूर्ण झाली. त्यानिमित्त महाड इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रम पार पडला.चवदार तळे जल शुद्धीकरण प्रकल्प आणि परिसर सुशोभीकरण प्रकल्पाचं भूमिपूजन त्यांच्या हस्ते झझालं.चवदार तळ्याचा हा सत्याग्रह भारताला समतेकडे नेणारा ठरला असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

या सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षाला सुरुवात होत असून,हे महात्मा ज्योतिबा फुले यांचं दोनशेवं जयंती वर्ष आणि संत गाडगेबाबा यांचं दिडशेवं जयंती वर्ष आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या वतीने हे समता आणि समरसता वर्ष म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.मुंबईत इंदू मिल इथलं बाबासाहेबांचं स्मारक लवकरच पूर्ण होईल,असं आश्वासन त्यांनी यावेळी दिलं. समाजामध्ये विषमता दूर करण्याची तसंच एक समतायुक्त समाज निर्माण करण्याची प्रतिज्ञा आज आपण घेऊया, असं मुख्यमंत्री म्हणाले.

हर्षवर्धन सपकाळ

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी २० मार्च १९२७ साली महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह करून ऐतिहासिक क्रांती केली. या ऐतिहासिक क्रांतीने जातीयवादी, स्पृश्य अस्पृश्य व्यवस्थेला मूठमाती देत समता, बंधुता व सामाजिक न्यायाचा संदेश दिला. महाडच्या चवदार

तळ्यातील पाणी हे 'समतेचे अमृत' असून या चवदार तळ्याचे पाणी घेऊन गावा-गावतील तलाव, नदी, धरणात सोडून 'समतेचा संदेश' सर्वदूर पोहचवा, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे. महाडमध्ये 'चवदार तळे सत्याग्रह समता शताब्दी वर्ष' सोहळ्याचा शुभारंभ कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, महात्मा गांधी यांचे पणतु, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तुषार गांधी, यांच्यासह कॉंग्रेस पदाधिकारी मोठ्या संख्येना उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह कॉंग्रेस पदाधिकारी कार्यकर्त्यांनी सभागृहापासून चवदार तळ्यापर्यंत पदयात्रा करून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले आणि चवदार तळ्यातील पाणी कलशात भरून कॉंग्रेस पदाधिका-यांना दिले. हे पाणी सर्व जिल्ह्यांमध्ये गावागावात जाऊन नदी, तलाव व धरणातही सोडले जाणार आहे.

उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन

उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन 21-22 मार्च 2026 रोजी महाराष्ट्राच्या भेटीवर येणार आहेत. उपराष्ट्रपती पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर हा त्यांचा पहिलाच महाराष्ट्र दौरा आहे.आपल्या या भेटीत 21 मार्च 2026 रोजी, उपराष्ट्रपती नागपूर इथल्या महर्षी व्यास सभागृहात भारतीय युवा संसदेच्या 29 व्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभाला उपस्थित राहणार आहेत.

विश्व हिंदू परिषद

विश्व हिंदू परिषद, विदर्भ प्रांताच्या नवीन कार्यालयाच्या इमारतीचे भूमिपूजन आज अयोध्या नगर येथील शारदा चौक परिसरात पार पडले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांच्या हस्ते विधिवत भूमिपूजन करण्यात आले. विश्व हिंदू परिषदचे हे नवीन कार्यालय सुमारे ४ हजार चौरस फूट जागेवर उभारण्यात येणार असून येथे आधुनिक सुविधांनी सुसज्ज पाच मजली इमारत बांधण्यात येणार आहे.

चिमणी दिवस

जागतिक चिमणी दिवस आज साजरा होत आहे. चिमण्यांच्या घटत चाललेल्या संख्येबद्दल जागरुकता निर्माण करणं आणि त्यांच्या संवर्धनासाठी प्रयत्न करणं, हा या दिनाचा मुख्य उद्देश आहे. वृक्ष बीज प्रसार करण्यात आणि किटकांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यात चिमण्यांसह सर्वच पक्षांचा मोठा वाटा असतो. बुलडाणा जिल्ह्यातले निसर्ग पर्यावरण अभ्यासक आणि पक्षीमित्र प्राध्यापक संजय गुरव गेल्या २० वर्षांपासून चिऊताई घरकूल योजनेच्या माध्यमातून चिमणी संवर्धनाकरता प्रयत्न करत आहेत. त्यांनी लाकडी घरट्यांची निर्मिती केली असून, महाराष्ट्रासह इतर सात ते आठ राज्यांमध्ये या घरट्यांचं वितरण करण्यात येतं. सिमेंटच्या जंगलात हरवणाऱ्या चिमण्यांसाठी अकोला इथल्या निवृत्त तलाठी सुनील कल्ले आणि प्रा.सुनीता कल्ले यांनी आपल्या घराला ‘चिमण्यांचे माहेरघर’ बनवले आहे. गेल्या २० वर्षांपासून ते पक्ष्यांसाठी पाणी व दाण्याची व्यवस्था करत जैवविविधता जपण्याचे कार्य करत आहेत.‘जागतिक चिमणी दिना’निमित्त त्यांनी नागरिकांना घराच्या गॅलरीत पाणी ठेवण्याचे आवाहन केले असून, त्यांच्या प्रेरणेने परिसरातही पक्ष्यांसाठी पाणवठे तयार होत आहेत.

‘जस्टा कॉजा’

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्कूल ऑफ लॉ येथे २३व्या ‘जस्टा कॉजा’ महोत्सवांतर्गत राष्ट्रीय युवक संसद व वादविवाद स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी सशक्त नागरिकच विकसित भारत-विकसित महाराष्ट्र घडवतील, असे प्रतिपादन केले. कुलगुरू डॉ.मनाली क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमाला डॉ. अजय चव्हाण, डॉ.रविशंकर मोर व डॉ. प्रवीणा खोब्रागडे उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी अधिकारांसोबत कर्तव्याची जाणीव ठेवावी, असे आवाहन जयस्वाल यांनी केले. डॉ. अजय चव्हाण यांनी संस्कारमय शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले, तर डॉ.मोर यांनी युवक संसदेमुळे लोकशाही बळकट होत असल्याचे सांगितले. देशभरातून १००हून अधिक प्रतिनिधी सहभागी झाले.

हिराई महोत्सव

ग्रामीण विकास विभागाच्या वतीने शेतकरी आणि बचतगट महिलांसाठी आजपासून तीन दिवसीय हिराई महोत्सवाचे आयोजन चंद्रपुरात करण्यात आले. या महोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्री अशोक उईके यांच्या हस्ते पार पडले. स्थानिक चांदा क्लब ग्राउंड येथे आयोजित या महोत्सवात शेतकऱ्यांसाठी विविध शेती उपयोगी साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामध्ये औजारे, गाई, म्हशी, बैल, ट्रॅक्टर आदी साहित्याचा समावेश करण्यात आला आहेत. यात बचतगटांनी तयार केलेल्या साहित्याचे प्रदर्शन आणि विक्री होणार आहे. या भव्य प्रदर्शनीत शेतकऱ्यांसोबत सर्वसामान्य नागरिकांच्या गरजेचे साहित्याची स्टॉल उभारण्यात आले आहेत.

रॉकेल

ग्रामीण भागात गॅस सिलिंडर बुकिंगसाठी ४५ दिवसांची मर्यादा असल्याने इंधन टंचाईची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे अंत्योदय व प्राधान्य गटातील सुमारे २.६७ लाख लाभार्थ्यांना रेशन दुकानातून रॉकेल देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुरवठा विभागाने ३.२६ लाख शिधापत्रिकाधारकांसाठी रॉकेलची मागणी नोंदवली असून, अकोला जिल्ह्यासाठी ३२६ केएल साठ्याची मागणी करण्यात आली आहे. उपलब्धतेनुसार प्रत्यक्ष पुरवठा किती होईल, हे लवकरच स्पष्ट होणार आहे.

हवामान

विदर्भात अनेक ठिकाणी अवकाळी पावसानं नुकसान झालं आहे. अकोट तालुक्यातील सावरा परिसरात अचानक हवामानात बदल होऊन जोरदार गारपीट आणि अवकाळी पावसाने हजेरी लावली. जवळपास एक तास गारपिटीसह सुरू असलेल्या या पावसामुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर गारांचा थर साचलेला दिसून आला. दरम्यान, अकोट शहरातही काही भागात पाऊस झाल्याने नागरिकांची तारांबळ उडाली होती. या अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला असून, सध्या काढणीच्या अवस्थेत असलेल्या गहू, कांदा पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच अंबा, टरबूज आणि खरबूज या फळपिकांनाही गारपिटीमुळे तडाखा बसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान वाढले आहे. बुलडाणा जिल्ह्यात अनेक भागात काल जोरदार अवकाळी पाऊस झाला. मेहकर तालुक्यात उकळी, सुकळी, डोणगावसह देऊळगाव

साकरशा परिसरात गारांचा पाऊस पडला. या पावसामुळे पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. दरम्यान, वर्धा नागपूर वाशीम आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये वादळी वारे आणि मेघगर्जने सह हलका पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे.

ऑर्लिन्स मास्टर्स बॅडमिंटन

फ्रान्समध्ये सुरू असलेल्या ऑर्लिन्स मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत, तन्वी शर्मा, इशाराणी बरुआ आणि मालविका बनसोड या भारतीय खेळाडूंनी 'पॅलेस डे स्पोर्ट्स'इथं महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. महिला उपउपान्त्यपूर्व फेरीत, तन्वीनं भारताच्याच अनमोल खरबचा पराभव केला; तर इशाराणी बरुआनं कॅनडाच्या वेन यू झांगचा पराभव केला. आणखी एका सामन्यात, नागपूरच्या मालविका बनसोडनं मलेशियाच्या वोंग लिंग चिंगला हरवलं. पुरुष दुहेरीत अर्जुन मदाथिल रामचंद्रन आणि हरिहरन अमसा करुणाकरन या जोडीनंही उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

*****